## BOMBAY ACT No. LXXIII OF 1959.

## AN ACT TO REPEAL CERTAIN LAWS RELATING TO THE LEVY OF DUTIES AND TAXES ON, AND THE REGULATION OF THE SALE AND WEREHOUSING OF TOBACCO.

## सन १९५९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ७३.

[राज्यपाल यांची संमति मिळाल्यानंतर, "मुंबई राजपत्रांत" दिनांक २९ डिसेंबर १९५९ रोजीं प्रथम (इंग्रजींत) प्रसिद्ध केलेला.]

### तंबाखूवर शुल्क व कर बसविण्यासंबंधींचें आणि तंबाखूची विक्री करण्याचें आणि ती वखारींत ठेवण्याचें नियमन करण्यासंबंधींच विवक्षित विधि रद्द करण्याबाबत अधिनियम.

ज्याअर्थी, तंबाखूवर शुल्क व कर बसविण्यासंबंधींचें आणि तंबाखूची विक्री करण्याचें व ती वखारींत ठेवण्याचें नियमन करण्यासंबंधींचे विवक्षित विधि रद्द करणें इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या दहाव्या वर्षी, याद्वारें, पुढीलप्रमाणें अधिनियम करण्यांत येत आहे :—

१. या अधिनियमास मुंबईचा तंबाखूसंबंधींचे विधि (रद्द करण्याबाबत) अधि-नियम, १९५९ असें म्हणावें. लघु संज्ञा.

२. राज्य सरकार राजपत्रांतील अधिसूचनेद्वारें जी तारीख नेमील त्या तारखेस व अशा तारखेपासून अनुसूचींत निर्दिष्ट केलेले विधि रद्द होतील. तंबाखूबाबत विवक्षित विधि रद्द करणें.

३. (१) मध्यप्रांत व वऱ्हाड तंबाखू अधिनियम, १९२९ (ज्याचा यांत यापुढें "उक्त अधिनियम" असा उल्लेख केला आहे) हा रद्द करण्यांत आला असला तरी, उक्त अधिनियम आणि त्यान्वयें किंवा त्यास अनुसरून केलेले नियम आणि आदेश हे, उक्त अधिनियम ज्या तारखेस रद्द करण्यांत येईल त्या तारखेपूर्वीच्या कोणत्याहि मुदतीच्या संबंधांत उक्त अधिनियमान्वयें फी बसविणें, आकारणी (फेर-आकारणीचा समावेश करून) करणें आणि फी गोळा करणें किंवा ती परत देणें याच्या कारणा-साठीं किंवा उक्त अधिनियमान्वयेंच्या कोणत्याहि शास्तीच्या किंवा कोणतीहि इतर रक्कम देण्याच्या कारणासाठीं आणि वर सांगितलेल्या कारणांपैकीं कोणत्याहि कारणाशीं संबंधित असलेल्या किंवा त्याच्याशीं आनुषंगिक असलेल्या इतर कोणत्याहि कारणासाठीं अंमलांत असण्याचें चालू राहील. बचाव.

(२) पोट-कलम (१) यांत असलेल्या उपबंधांस बाध न येतां आणि त्यास अधीन राहून, मुंबई सर्वसाधारण परिभाषा अधिनियम, १९०४ याचें कलम ७ हें अनुसूचित निर्दिष्ट केलेल्या विधींपैकीं प्रत्येक विधि रद्द करण्यास, जणूं काहीं तो विधि मुंबई अधिनियमान्वयें रद्द करण्यांत आलेला अधिनियम असल्याप्रमाणें लागू होईल.

४. या अधिनियमाच्या उपबंधांची अंमलबजावणी करतांना जर कोणतीहि अडचण उद्‌भवली तर, राज्य सरकारला राजपत्रांत प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारें त्यास दूर करणें अडचण दूर करण्यासाठीं आवश्यक वाटेल अशी तरतूद करण्याचा किंवा त्यास आवश्यक वाटेल असा निदेश देण्याचा अधिकार आहे. अडचणी दूर करणें.

## अनुसूचि.

(कलम २ पहा.)

१. तंबाखू शुल्क (मुंबई शहर) अधिनियम, १८५७ (सन १८५७ चा मुंबई अधिनियम क्रमांक ४).

२. मुंबई (जिल्हा) तंबाखू अधिनियम, १९३३ (सन १९३३ चा मुंबई अधिनियम क्रमांक २).

३. तंबाखू शुल्क (मुंबई शहर) अधिनियम, १८५७ आणि मुंबई (जिल्हा) तंबाखू अधिनियम, १९३३ (तहकूब करण्याबाबत) अधिनियम, १९४५ (सन १९४५ चा मुंबई अधिनियम क्रमांक ११).

४. मध्यप्रांत व वऱ्हाड तंबाखू अधिनियम, १९३९ (सन १९३९ चा मध्यप्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक ८).

(True translation)

P. S. THORAT,

Examiner of Books and Publications, Bombay.